क.मुं.वि.मं./शाखा लेखा–१ व २/ 2393
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३
दिनांक:– ११/०१/२०२२

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळ कार्यकक्षेतील,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,

विषय:– **फेब्रुवारी–मार्च २०२१ च्या परीक्षेचे इ. १० व इ. १२ वी च्या विदयार्थ्यांचे परीक्षा शुल्क परताव्याबाबत.**

संदर्भ:–१.क्र.मुं.वि.मं./शाखा लेखा–१ व २/१९८९ दि. १५.११.२०२१चे पत्र.
२.क्र.मुं.वि.मं./शाखा लेखा–१ व २/२३८० दि. २०.१२.२०२१चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय क्र. १ च्या पत्रानुसार आपणास सन फेब्रुवारी–मार्च २०२१च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेतील विदयार्थ्यांच्या परीक्षा शुल्काची रक्कम परत मिळणेबाबत करावयाच्या कार्यपध्दती व सुचनाचे परीपत्रक तसेच संबधित विदयार्थ्यांना रक्कम अदायगी केल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना (पृष्ठ क्र.१ ते ४) व राज्यमंडळ कार्यालयाचे प्रकटन तसेच शाळा/कनिष्ठ महाविदयालय प्रमुखांनी करावयाची कार्यपध्दती व सूचनांचे परिपत्रक आपणास मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते.

उपरोक्त संदर्भिय क्र. २ च्या पत्रानुसार काही शाळा व कनिष्ठ महाविदयालय यांचे कडून उपरोक्त कार्यवाही अदयापही पूर्ण झाली नसल्याचे मंडळाचे निदर्शनास आले आहे. तरी शाळा/कनिष्ठ महाविदयालय प्रमुखांनी दिनांक ३१.१२.२०२१ पर्यंत उपरोक्त प्रमाणे कार्यवाही पूर्ण करण्यात यावी, असे कळविण्यात आले होते.

सदर योजनेस दिनांक १५.०१.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. याबाबत सर्व संबधित शाळा/कनिष्ठ महाविदयालय प्रमुखांनी नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी,नवी मुंबई ४०० ७०३.

---

Telephone :- 27652445 , 27662504 , 27881075 , 27881077, 27899987 * Fax *:- 27659491 / 27881349
*Email * : sschsc.mumbaiboard@gmail.com * Website *: www.sscboardmumbai.in

Scanned with CamScanner